क्रमांक 93360/ह-२
महाराष्ट्र विधानमंडळ
सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : जुलै, २०२६.
28 JUL 2026

# :: परिपत्रक ::

**विषय :- मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्यांना महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांना रेल्वेने विनामुल्य प्रवास सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता विकसित करण्यात आलेल्या Railway Coupon Management System (RCMS) या आज्ञावलीचे प्रात्यक्षिक (Demo)**

मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्यांना महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (रेल्वेने विनामुल्य प्रवास) नियम, १९६५ अन्वये रेल्वेने विनामुल्य प्रवासाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून उक्त नियमातील तरतूद खालीलप्रमाणे आहे:-

नियम ८ (१) सचिवाने सदस्यास कुपन पुस्तक देण्यापुर्वी ज्या सदस्याला ते द्यावयाचे असेल त्याचे नांव त्या कुपन पुस्तकांवर लिहिले पाहिजे २) असे कोणतेही कुपन पुस्तक देण्यापुर्वी सचिव योग्य अशा एका प्रतिज्ञापत्रावर सदस्यांची रितसर सही घेईल.

आता सदरहू कामकाज Railway Coupon Management System (RCMS) आज्ञावलीद्वारे ऑनलाईन (Online) पध्दतीने सुरू करण्यात येणार असल्याने यापुढे (१) रेल्वे कुपन पुस्तकाची मागणी (Request) मा.सदस्यांच्या अधिकृत लॉगईनमधून (संसदीय आयुधे सादर करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले) प्राप्त झाल्यानंतर अधिकृत स्वीय सहाय्यकांच्या ओळखपत्राची नोंद घेऊन मा.सदस्यांना कुपन पुस्तके वितरित करणे (२) वापर केलेल्या रेल्वे कुपनचा हिशेब घेणे इत्यादी कामकाज सदर आज्ञावलीद्वारे करण्यात येणार आहे.

**मा.सदस्यांच्या व त्यांच्या अधिकृत स्वीय सहाय्यकांच्या माहितीकरिता Railway Coupon Management System (RCMS) या आज्ञावलीचे प्रात्यक्षिक (Demo) मंगळवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आले आहे, याची कृपया नोंद घ्यावी.**

डॉ.विलास आठवले
सचिव-३
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति : महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व विद्यमान सदस्य व मा.सदस्यांचे अधिकृत स्वीय सहाय्यक**

D:\C-drive backup\d-1\2025\Railway Coupen online software\paripatrak.docx